**सहायक (गट-क) संवर्गात तात्पुरत्या व स्थानापन्न स्वरुपात पदोन्नत्या/नेमणुका/बदल्या**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण**
**गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१**
**आदेश क्र.प्राधि/पदोन्नती/सहायक/२०२५/ /प्र.८**
**दिनांक:-**

आदेश

प्रशासकीय हित व कामाची निकड लक्षात घेऊन **वरिष्ठ लिपिक (गट-क)** या संवर्गातील खालील नमूद कर्मचाऱ्यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून **सहायक (गट-क)** या संवर्गात **एस-१४ (रु.३८६००-१२२८००)** या वेतनस्तरामध्ये तदर्थ, पूर्णपणे तात्पुरत्या आणि स्थानापन्न स्वरुपात कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नतीनंतर त्यांची पदस्थापना त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव | सध्याचे मंडळ | पदोन्नतीनंतरचे कार्यालय व मंडळ | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | श्री. विनय रोहीदास टोंबरे | छ. संभाजी नगर मंडळ | छ. संभाजी नगर मंडळ | श्री एस पी ढोले, सहायक यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |
| २. | श्री. निलेश महादेवसिंग गहेरवार | नागपूर मंडळ | विधी सल्लगार/प्रा. | श्रीमती. अनघा दळवी, सहायक यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |
| ३. | श्री.प्रताप बबनराव सुर्य | कोंकण मंडळ | अमरावती मंडळ | श्री. स्वप्नील भारती, सहायक यांच्या बदलीने रिक्त जागी |
| ४. | श्रीम. मोनीका शिवाजी नाईक | मुंबई मंडळ | कार्यकारी अभियंता/ बोरीवली/मुंबई मंडळ | श्री.संतोष आडेकर, सहायक यांच्या सेवानिवृत्तीने रिक्त पदी |
| ५. | श्री. कौशल पांडुरंग सोनवणे | प्राधिकरण | सहायक लेखाधिकारी/ परि-३/मुं.इ.दु. व पु. मंडळ | श्रीम. तन्वी नवार, सहायक यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |
| ६. | श्रीमती. कस्तुरी जयंत परब | प्राधिकरण | इमारत परवानगी कक्ष/ प्राधिकरण | रिक्त पदी |
| ७. | श्रीमती. प्रिती पवन जनबंधू | मुंबई मंडळ | मुंबई मंडळ | रिक्त पदी |
| ८. | श्री. मनोज चिंतामण गायकवाड | मुंबई मंडळ | सहायक लेखाधिकारी/ परि-१/मुं.इ.दु.व पु.मंडळ | रिक्त पदी |
| ९. | श्री. सहादु मारुती सुरकुले | पुणे मंडळ | पुणे मंडळ | रिक्त पदी |
| १०. | श्री.शरद नामदेव सोरटे | मुंबई मंडळ | मि. व्य./वांद्रे/सं.गा./ मुं.इ दु. व पु.मंडळ | श्री. सुधीर गायकवाड, सहायक यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |
| ११. | श्री. अभिजीत ज्ञानेश्वर पवार | प्राधिकरण | मुख्य लेखाधिकारी/ मुंबई मंडळ | श्रीम. जयश्री नाईक, सहायक यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |
| १२. | श्री. देवीदास सिताराम सोनवणे (दिव्यांग) | मुंबई मंडळ | उपमुख्य अधिकारी/ पणन/मुंबई मंडळ | श्री. संतोष भोसले,सहायक यांच्या पदोन्नतीने रिक्त पदी |

२/- सदरहू, पदोन्नती मा.न्यायालयात दाखल केलेल्या याचिका क्र. (४८४/२०२३) च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहेत.

३/- सदरहू, कर्मचाऱ्यांची तात्पुरत्या तदर्थ पध्दतीनुसार पदोन्नतीने केलेली नेमणूक सहायक संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमाच्या अधीन राहून ज्येष्ठतेनुसार तात्पुरत्या तदर्थ व स्थानापन्न स्वरुपाची असल्याने त्यांचा या संवर्गातील कायम पदावर कोणताही हक्क/धारणाधिकार राहणार नाही, या अटीवर करण्यात येत आहे.

४/- प्रशासकिय निकड व कार्यभाराच्या आवश्यकतेनुसार पदांच्या संख्येत बदल झाल्यास सदर तात्पुरती व स्थानापन्न पदोन्नती रद्द होऊन सेवाजेष्ठतेनुसार कनिष्ठतम संबंधित कर्मचारी पदावनतीस पात्र ठरतील.

५/- संबंधित पदोन्नत पदधारकास पदोन्नतीनंतर अनुज्ञेय वेतनाबरोबर महागाई भत्ता व अन्य भत्ते नियमानुसार अनुज्ञेय राहतील. अनु.क्र. २ व ३ वरील कर्मचाऱ्यास नियमानुसार पदग्रहण अवधी व बदली प्रवास भत्ता अनुज्ञेय राहील.

६/- शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्र.वेतन-१०८२/सीआर-११०० [एक]/सेवा-३, दि.०६.११.१९८४ नुसार संबंधित पदोन्नत पदधारकाने आपल्या वेतन निश्चितीचा विकल्प पदोन्नतीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावयाचा आहे अन्यथा त्यांची वेतन निश्चिती सरळ महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ ची दि.०३.०७.१९९३ अन्वयेची सुधारणा अर्थात महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) (दुसरी सुधारणा) नियम १९९३ नियम ११ (१) मधील तरतुदीनुसार करण्यात येईल.

७/- संबंधित पदोन्नत पदधारकास सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेला असल्यास, त्यांची वेतननिश्चिती पुन्हा करण्यात येऊ नये. याबाबत त्यांच्या सेवापुस्तकातील नोंदी पाहून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

८/- उक्त आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सात दिवसाच्या आत पदोन्नत पदधारक यांनी नवीन नेमणूकीच्या ठिकाणी रुजू व्हावयाचे आहे. पदस्थापनेच्या संदर्भात केलेल्या पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही. त्यांच्या सक्षम अधिकाऱ्यांनी स्थानिक पर्यायी व्यवस्था करुन त्यांना तात्काळ कार्यमुक्त करावे.

९/- पदोन्नत पदधारक हे पदोन्नतीनुसार पदस्थापनेच्या जागी तात्काळ रुजू न झाल्यास, त्यांना पदोन्नतीमध्ये स्वारस्य नाही, असे गृहीत धरण्यात येईल. तसेच याबाबत शासन निर्णय दि.१२.०९.२०१६ मधील तरतूदीनुसार त्यांची पदोन्नती रद्द करण्यात येईल.

१०/- उपरोक्त कर्मचाऱ्यांची कनिष्ठ संवर्गातील सेवाजेष्ठता वरिष्ठ संवर्गात अबाधित राहील.

११/- मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी याचिका क्र.२७९७/२०१५ मध्ये दि.०४.०८.२०१७ रोजी दिलेल्या निर्णयाविरोधात राज्य शासनाने मा. सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ दाखल केलेली आहे. सदर याचिका अद्याप प्रलंबित आहे. शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि.०७.०५.२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ च्या स्थितीनुसार निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सेवाज्येष्ठतेनुसार मा. सर्वोच्च न्यायालयाच्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून देण्यात येत आहे. पदोन्नत पदधारकाकडून या अटीची पुर्तता होत नसल्याने आढळून आल्यास पदोन्नती आदेश रद्द करण्यात येतील.

**१२/- उपरोक्त कर्मचाऱ्यांनी दि.३१.०३.२०२५ रोजीचे विहित विवरणपत्रात मत्ता व दायित्व भरुन दिल्याची खात्री करुन घेतल्याखेरीज संबंधित कर्मचाऱ्यांना पदोन्नतीचे आदेश हस्तांतरित करण्यात येऊ नयेत, तसेच आदेश हस्तांतरित करण्यापूर्वी सदर कर्मचाऱ्यांनी मत्ता व दायित्वे सादर केल्याचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.**

**१३/- संबंधीत कर्मचारी यांना या आदेशाव्दारे तात्काळ कार्यमुक्त करण्यात येत आहे.**

सदरहू आदेश तात्काळ अंमलात येतील.

**(मा.उपाध्यक्ष तथा मु.का.अ./प्राधिकरण यांचे मान्यतेने)**

(नीलिमा धायगुडे)
सचिव/प्राधिकरण

प्रति,

- - - - - - - - - - - - - - - -

(संबंधित विभाग प्रमुख यांच्यामार्फत)

प्रत सस्नेह अग्रेषित

१) मा.मुख्य दक्षता व सुरक्षा अधिकारी/प्रा.
२) मा.मुख्य अधिकारी, मुंबई मंडळ, मुं.इ.दु. व पु. मंडळ
३) उपमुख्य कार्यकारी अधिकारी/प्रा.
४) मुख्य अधिकारी/कोकण मंडळ/पुणे मंडळ/छ.संभाजीनगर मंडळ/नागपूर मंडळ/अमरावती मंडळ
५) विधी सल्लागार/प्रा.
६) सहमुख्य अधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु. व पु. मंडळ
७) वित्त नियंत्रक/प्रा.
८) मुख्य माहिती व संचार तंत्रज्ञान अधिकारी/प्रा. (संकेतस्थळावर प्रसिध्द करणेकरिता)
९) चौकशी अधिकारी/प्रा.
१०) सक्षम प्राधिकारी/प्रा.
११) मुख्य जनसंपर्क अधिकारी/प्रा.
१२) निवासी लेखा परिक्षा अधिकारी/प्रा.
१३) पी.डी.सी. पुणे

प्रत :-

१. उपमुख्य अभियंता/इ.प.कक्ष/प्रा.
२. उपमुख्य अधिकारी/सं.गा./मुं.इ.दु. व पु. मंडळ
३. कार्यकारी अभियंता/इ.प.कक्ष/प्रा.
४. कार्यकारी अभियंता/बोरीवली/मुंबई मंडळ
५. मुख्य लेखा अधिकारी/मुंबई मंडळ/मुं.इ.दु. व पु. मंडळ
६. लेखा अधिकारी/प्रा./मुं.इ.दु. व पु. मंडळ/कोकण मंडळ/छ.संभाजीनगर मंडळ/पुणे मंडळ/नागपूर मंडळ/अमरावती मंडळ
७. सहायक लेखाधिकारी/मुंबई मंडळ, सहायक लेखाधिकारी/परि-३/मुं.इ.दु. व पु. मंडळ
८. मि.व्य./वांद्रे/सं.गा./मुं.इ.दु. व पु. मंडळ
९. मिळकत व्यवस्थापक/कुर्ला/मुंबई मंडळ
१०. मिळकत व्यवस्थापक/चेंबुर/मुंबई मंडळ
११. प्रशासकीय अधिकारी, प्रा./मुंबई मंडळ/मुं.इ.दु. व पु. मंडळ/कोकण मंडळ/पुणे मंडळ/छ.संभाजीनगर मंडळ/नागपूर मंडळ/अमरावती मंडळ

**प्रत माहितीसाठी :-**

१. मा.उपाध्यक्ष/प्रा. यांचे स्वीय सहाय्यक
२. अध्यक्ष, महाराष्ट्र गृहनिर्माण कर्मचारी संघटना
३. प्रधान कार्यवाह, मागासवर्गीय कर्मचारी संघटना
४. अध्यक्ष, ग्रॅज्युएट इंजिनिअर्स असोसिएशन ऑफ म्हाडा, मुंबई
५. अध्यक्ष, महाराष्ट्र हाऊसिंग बोर्ड एम्पलॉईज को ऑप क्रेडिट सोसायटी लि. मुंबई

**प्रत :-** प्रशासन-६,८,९,१०,१२,१३,१४(अ) व १४ (ब)/प्रा.